| | |
|---|---|
| MHAH080015062014 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक ११३/२००० मधील**<br>**नि. २०४ वरील आदेश**<br>*(आण्णा पंढरीनाथ लेंडे व इतर*<br>***विरुद्ध***<br>*गणपत बाबुराव लेंडे व इतर)* |

प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी प्रस्तूतचा अर्ज हा त्यांच्याविरुद्ध "उलटतपास नाही" असा झालेला आदेश रद्द व्हावा याकरीता अर्ज दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी प्रस्तूत अर्जान्वये असे कथन केले आहे की, त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे ते उलटतपासा संदर्भातील महत्वाची माहिती वकिलांना देऊ शकले नाही व त्याबाबत मुदत देखील मागितली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्याविरुध्द उलटतपास नाही आदेश पारित झाला. परंतु, वादीचा सदर दाव्याच्या कामी उलटतपास घेणे गरजेचे आहे. सबब, प्रतिवादी यांच्याविरूद्ध झालेला "उलटतपास नाही" हा आदेश रद्द होवून उलटतपास घेणेस परवानगी मिळावी अशी मागणी केली आहे.

**०३.** वादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा व बरोबर नाही. प्रतिवादींचे पुर्वीचे विधिज्ञांनी निशाणी १९७ अन्वये पुरसिस देऊन प्रतिवादी त्यांना कामकाजाविषयी माहिती देत नसल्याने त्यांनी प्रतिवादींचे प्रतिनिधित्व न करण्याबाबत नमुद केले आहे. तसेच, प्रतिवादींनी उलटतपासाकामी यापुर्वी बऱ्याचवेळा मुदती घेतल्या असुन ते वादीवर दाव्यामध्ये तडजोड करण्यासाठी दबाव आणत आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्यात यावा. यदाकदाचित कोर्टाचे मत झाल्यास प्रतिवादीस जास्तीत जास्त कॉस्ट्स चा हुकूम व्हावा ही विनंती केली.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांना युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींनी योग्य मुदतीमध्ये वादी यांचा उलटतपास घेणे आवश्यक होते परंतू सदरचा उलटतपास घेणेकामी प्रतिवादींना विलंब झालेला असून ''प्रतिवादीविरूद्ध उलटतपास नाही'' असा आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादीने वादीचा उलटतपास घेणे व त्यांना संधी देणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे असले तरीही सदर दाव्यातील प्रतिवादीचे एकंदर वर्तन पाहता

प्रतिवादी सदर दाव्याचे कामकाज वेळोवेळी लांबणीवर पडण्यास कारणीभुत असल्याचे दिसुन येते. परंतु, कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे ते उलटतपासा संदर्भातील महत्वाची माहिती वकिलांना देऊ शकले नाही व त्याबाबत मुदत देखील मागितली नाही. सबब, प्रतिवादींचा बचाव अभिलेखावर येऊन दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी सदर अर्ज न्यायाच्या हितार्थ मंजूर करणे आवश्यक आहे. परंतु, त्याचवेळी वादी यांना प्रतिवादीने केलेल्या विलंबामुळे झालेल्या त्रासाची नुकसान भरपाई मिळणे देखील आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी वादी यांना रक्कम रु. २,०००/- असा खर्च देवून सदरचा आदेश रद्द करण्यात येतो. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज (नि.२०४) खर्चासह मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी वादीस रक्कम रु. २,०००/-(रक्कम रु. दोन हजार मात्र) खर्च देऊन प्रतिवादी विरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यात येतो. |
| **३.** | वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी. |

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2025.11.04 17:39:50 +0530

संगमनेर **(श्रीमती. एस.बी.ढवळे.)**
दि. ०३/११/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.